




महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

समर्थ

# गांवकरी

POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026 | रविवार दि. ०५ जूलै २०२६

आवृती- अहील्यानगर,मुबंई,ठाणे,पालघर,सिंधुदुर्ग,रत्नागिरी








संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे | नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ५ | वर्ष : ४ थे | अंक : २०५ | किंमत : ४ रूपये | Gmail : aklgavakari@gmail.com Gmail : punegavkari@gmail.com


## घुलेवाडीत आज 'शिवम् मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल' चे ५ जुलैं रोजी लोकार्पण

संगमनेर (समर्थ गांवकरी)

**अहिल्यानगर जिल्ह्यातील संगमनेर अकोले आळेफाटा सिन्नर कोपरगाव लोणी नारायणगाव परिसरातील नागरिकांना आधुनिक व दर्जेदार आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने आरोटे हॉस्पिटल आता नव्या व अत्याधुनिक स्वरूपात 'शिवम् मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल' म्हणून स्थलांतरित होत आहे. या नव्या रुग्णालयाच्या लोकार्पण सोहळ्याचे आयोजन आज रविवार, दि. ५ जुलै २०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता फ्लोरा टाऊनशीप, एसएमबीटी डेंटल कॉलेज समोर, पुणे-नाशिक महामार्गालगत, राजपाल सुपरशॉपी मागे, घुलेवाडी (ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर) येथे करण्यात आले आहे.**

डॉक्टर अतुल आरोटे यांनी अनेक वर्षांपासून या पंचक्रोशीत नव्हे तर पाच ते सहा जिल्ह्यातील रुग्णांमध्ये एक आरोग्य दूत म्हणून उत्कृष्ट कार्य केले आहे अनेक वर्षांची परंपरा ना नफा ना तोटा या तत्त्वावर या भागातील नागरिकांना कोरोना काळ व आपल्यातील एक देव माणूस म्हणून या हॉस्पिटलचे पाहिले जाते या रुग्णालयाने आजपर्यंत कोट्यावधी रुग्णांचा विश्वास कमवला आहे या रुग्णालयात सेवा देत असताना आपल्याकडे येणारा प्रत्येक जण अत्यंत महत्त्वाचा मानला जातो या ठिकाणी असणारे सुख सुविधा या ठिकाणी असणारा स्टाफ या ठिकाणी असणाऱ्या सर्व भौगोलिक गोष्टींकडे पाहता डॉक्टर अतुल आरोटे यांनी नेहमी मला नफा नको



### अत्याधुनिक वैद्यकीय सुविधा नागरिकांच्या सेवेत!

मला तुमच्या चेहऱ्यावरील आनंद हाच माझा नफा मानून मोठे आरोग्य सेवेचे जाळे निर्माण केले आहे आजही पुणे नाशिक एरिया नगर ठाणे संभाजीनगर सोलापूर या भागातील रुग्ण या ठिकाणी येत असतात त्यांनी आपल्या प्रॅक्टिस मध्ये अनेकांना उभारी देण्याचे काम केले आहे हा सर्व परिवार एक असून सेवा देण्यासाठी आम्ही सक्षम आहोत स्पर्धेच्या युगात जादा सुविधा कशा देता येईल यासाठी त्यांनी भव्य दिव्य असे संकुल या ठिकाणी साकारले आहे यातून नक्कीच एक आदर्श निर्माण करण्याचा आमचा संकल्प आहे वारकरी संप्रदायातील आरोपी परिवाराचे नाव व आपल्या कार्यातून या परिवाराने नेहमी एक आदर्श निर्माण केला आहे त्याच धर्तीवर आज राज्यात आरोटे हॉस्पिटल आता नामांतर होऊन शिवम हॉस्पिटल हे नवीन वर्धापन करत असते तरी सेवा सुविधा या मात्र देण्यामध्ये आम्ही आघाडीवर राहू असा त्यांचा विश्वास आहे या समूहातील सर्व परिवार डॉक्टर अतुल आरोटे डॉक्टर स्वप्नाली अतुल आरोटे डॉक्टर अंकुश आरोटे डॉक्टर सौ आरोटे यांच्यावर या परिवारातील प्रमुख सेवानिवृत्त उप अभियंता इंजी.रामनाथ आरोटे व प्राध्यापक जे डी. आरोटे हरिभक्त परायण दशरथ नाना आरोटे माजी ग्रामपंचायत सरपंच देऊबाभाई आरोटे. स्वर्गीय सेवानिवृत्त शिक्षक वामन बाबा आरोटे उल्हास आरोटे यांच्या आशीर्वादाने या परिवाराने एक नावलौकिक प्राप्त केला आहे वारकरी संप्रदाय सामाजिक शैक्षणिक उत्कृष्ट शेती उत्कृष्ट अधिकारी यामध्ये देखील या परिवाराने एक आपला वेगळा आदर्श निर्माण करण्यात त्यांचा वाटा राहिला आहे आरोटे हॉस्पिटल हे अनेक वर्षांपासून संगमनेर शहरात सेवेमध्ये त्यांनी वेगळे नाव निर्माण केले आहे अत्यंत संयमी अत्यंत शांत अत्यंत लोकप्रिय अशी ख्याती असलेले नामांकित आरोग्य दोन म्हणून डॉक्टर अतुल आरोटे यांनी आपल्या कार्यातून आपली प्रचलित निर्माण केली आहे त्यांच्या सर्व यशामध्ये आपल्या परिवाराने दिलेले योगदान आई-वडिलांचे आशीर्वाद सर्वसामान्य जनतेचे मिळालेले प्रेम व भविष्यकाळात देखील रुग्णसेवेसाठी २४ तास सेवा देणे हेच आमचे कर्तव्यव असल्याचे देखील त्यांनी यावेळी बोलताना सांगितले. या लोकार्पण सोहळ्याला राज्याचे महसूल मंत्री तथा लोकनेते बाळासाहेब थोरात, विधान परिषदेचे सदस्य आमदार सत्यजीत तांबे, संगमनेर नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा मैथिलीताई तांबे, आमदार अमोल खताळ पाटील, आमदार डॉ. किरण लहामटे, माजी आमदार वैभवराव पिचड, समाज प्रबोधनकार ह.भ.प. निवृत्ती महाराज देशमुख, ब्रह्माकुमारी राजयोगिनी नलिनी बहेनजी, माजी जिल्हा परिषद सदस्य सिताराम राऊत यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित राहणार आहेत. तसेच वैद्यकीय क्षेत्रातील अनेक मान्यवर, लोकप्रतिनिधी आणि ग्रामस्थही या कार्यक्रमास उपस्थित राहणार आहेत. नवीन रुग्णालयामध्ये जनरल मेडिसिन, जनरल सर्जरी, ऑर्थोपेडिक्स, कार्डिओलॉजी, गॅस्ट्रोएन्टेरोलॉजी, नेफ्रोलॉजी व युरोलॉजी, न्यूरोलॉजी, न्यूरोसर्जरी, पॅथॉलॉजी लॅब, डिजिटल एक्स-रे, एन्डोस्कोपी, सोनोग्राफी आदी सुविधा उपलब्ध असणार असून, भविष्यात कॅथलॅब आणि सीटी स्कॅन सुविधाही सुरू करण्यात येणार आहेत. याशिवाय ५० बेडचे सुसज्ज मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल, अत्याधुनिक ऑपरेशन थिएटर आणि २४ तास आपत्कालीन सेवा उपलब्ध राहणार आहे. या लोकार्पण सोहळ्यास नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून नव्या आरोग्यसेवेचा लाभ घ्यावा, असे आवाहन निमंत्रक सौ. विद्या व इंजि. रामनाथ दशरथ आरोटे, डॉ. स्वप्नाली व डॉ. अतुल आरोटे, डॉ. स्नेहल व डॉ. अंकुश आरोटे तसेच आरोटे हॉस्पिटलच्या सर्व डॉक्टर व कर्मचारीवृंद यांच्या वतीने करण्यात आले आहे.









# राज्य नशा मुक्त करण्याचे नामदार विखे यांचे आव्हान

**शिर्डी (समर्थ गांवकरी)**




अमली पदार्थ मुक्त देश करण्यासाठी सुरू झालेल्या मोहीमेत भाजयुमोने सुध्दा पुढाकार घ्यावा.केंद्रीय मंत्री अमित शाह यांनी संपूर्ण देशभर यासाठी मोहीम सुरू केली आहे.राज्यातही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याबाबत कडक धोरण घेतले असून,,युवा शक्ती जागर यात्रेतून भाजयुमोने राज्य नशामुक्त करण्याचा संदेश युवकांमध्ये पोहचविण्याचे आवाहन जलसंपदा तथा पालक मंत्री ना.राधाकृष्ण विखे पाटील यांनी केले.

भारतीय जनता युवा मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष कृष्णकांत महाडीक यांच्या नेतृत्वाखाली सुरू करण्यात आलेल्या युवा शक्ती जागर यात्रेचे शुक्रवारी शिर्डीत आगमन झाले.यानिमित्ताने आयोजित केलेल्या युवा मोर्चाच्या मेळाव्यात मंत्री विखे पाटील यांनी युवक कार्यकर्त्यांशी संवाद साधला.भाजपाचे जिल्हाध्यक्ष नितीन दिनकर,सरचिटणीस अशोक पवार भाजपयुमोचे उतर जिल्ह्याचे अध्यक्ष रोहीत चौधरी,नगराध्यक्षा सौ. जयश्री थोरात,उपनगराध्यक्ष अभय शेळके,भाजपाचे शहर अध्यक्ष रविंद्र गोंदकर,यांच्यासह उतर अहील्यानगर जिल्ह्यातील कार्यकर्ते उपस्थित होते.

केंद्रीय मंत्री अमित शाह यांनी संपूर्ण देश नक्षलमुक्त करून दाखवला.आता अंमली पदार्थ मुक्त देश करण्यासाठी त्यांनी धडक मोहीम सुरू केली आहे. देशाच्या सामाजिक व्यवस्थेला अमली पदार्थांचे रॅकेट उध्वस्त करीत आहेत. याविरोधातील मोहीम यशस्वी करायची असेल तर, सर्वाच्या प्रयत्नांची गरज असल्याचे सांगून मंत्री विखे पाटील म्हणाले की,युवकांमध्ये जावून यासाठी प्रबोधन करावे लागेल.युवा मोर्चाच्या माध्यमातून यासाठी प्रयत्न व्हावेत आशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

आज देश एक परीवर्तनाच्या काळातून जात आहे. तरुणांचा देश म्हणून जगात भारताची ओळख आहे. त्यामुळेच देशातील युवा शक्तीला पुढे घेवून जाण्याचा यशस्वी प्रयत्न सुरू असून,देशाची युवा शक्ती म्हणजे बौध्दीक आणि उर्जासंपन्न शक्ती असल्याचे सांगून,मागील बारा वर्षात सर्वाधिक स्टार्ट अप,मेक इन इंडीया आणि डिजिटल इंडियाच्या प्रक्रीयेत युवा शक्तीला मोठे स्थान मिळाले असल्याकडे मंत्री विखे पाटील यांनी सांगितले.

आज राज्यात मोठ्या प्रमाणात उद्योगाची गुंतवणुक येत आहे.याचा उपयोग युवकांनाच होणार आहे. अहील्यानगर जिल्हा सुध्दा डिफेन्स उद्योगाचे मोठे केंद्र बनत आहेत.आत्म निर्भर भारत योजनेतून सुरू असलेली उद्योगाची उभारणी ही देशातील युवाशक्तीचे बलस्थान असल्याचे मंत्री विखे पाटील म्हणाले.

केंद्र आणि राज्य सरकारचे निर्णय जनतेपर्यत घेवून जाण्याची मोठी जबाबदारी भाजयुमोवर आहे.सरकारचे काम समाजात सांगण्यास आपण कमी पडतो म्हणूनच काही शक्ती डोके वर काढून युवकांमध्ये वातावरण कलुषित करण्याचा प्रयत्न करतात.पण आशा प्रवृतीना जनाधार नसतो.

भाजयुमोचे प्रदेशाध्यक्ष कृष्णकांत महाडीक यांनी आपल्या भाषणात यात्रेम ागील उद्देश विषद करताना सांगितले की,तरुणांना राष्ट्रीय विचारांच्या प्रवाहात आणताना राज्याच्या सांस्कृतिक अध्यात्मिक परंपरांची माहीती करून देण्याचा प्रयत्न आहे.केंद्र आणि राज्य सरकारच्या माध्यमातून सुरू असलेल्या विकास प्रक्रीयेची माहीती युवकांपर्यत पोहचविण्याचा प्रयत्न असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हाध्यक्ष रोहीत चौधरी यांनी केले.

# महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या वतीने भजन सम्राट पद्मश्री अनुप जलोटा यांच्यासह मान्यवरांचा सत्कार!







**मुंबई (समर्थ गांवकरी)**

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबईच्या वतीने नवी मुंबईतील सानपाडा येथील शिकारा हॉटेलच्या सभागृहात आयोजित भव्य कार्यक्रमात भजन सम्राट पद्मश्री अनुप जलोटा, अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळाचे अध्यक्ष मेघराज राजे भोसले तसेच आपल्या नावावर नऊ विश्वविक्रमांची नोंद असलेले सुप्रसिद्ध गायक व समाजसेवक विराग मधुमालती वानखेडे यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

सुप्रसिद्ध गायक व समाजसेवक विराग म धुमालती वानखेडे यांच्या नवव्या विश्वविक्रम आणि 'अकराशे सात गीतांचा भव्य भक्ती के महासागर' या ग्रंथाच्या विमोचन सोहळ्यानिमित्त आयोजित कार्यक्रमात महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष निलेश सोमानी यांच्या हस्ते मान्यवरांना पत्रकार संघाची दिनदर्शिका व डायरी भेट देऊन सन्मानित करण्यात आले.

या प्रसंगी कार्यक्रमाला सौ. वंदना वानखेडे, मोतीलाल जैन, अर्जुन संघवी, अनघा मेघा इव्हेंटचे संचालक उन्मेष चौधरी, विनय मोरे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमात मान्यवरांनी विराग मधुमालती वानखेडे यांच्या संगीत, समाजसेवा आणि विश्वविक्रमाच्या उल्लेखनीय कार्याचे कौतुक करत त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या वतीने करण्यात आलेल्या या सन्मानामुळे कार्यक्रमाला विशेष प्रतिष्ठा लाभली.

# राज्यातील जागृत देवस्थान असलेल्या मळगंगा देवीचा यात्रा उत्सव सुरू !

- देवीला हळद लावण्यासाठी मळगंगा मंदीरात शेकडो महिलांची गर्दी
- जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा शालिनीताई विखे पाटील यांची उपस्थिती!

**टाकळी ढोकेश्वर (समर्थ गांवकरी)**

राज्यातील जागृत देवस्थान असलेल्या मळगंगा देवीचा यात्रा उत्सव बुधवार दि.१ एप्रिल रोजी सुरू झाला असून दुपारी पाच ते सायंकाळी सहा वाजेपर्यंत शेकडो महिलांनी मळगंगा मंदीरात गर्दी करुण हळद लावण्याचा आनंद घेतला. जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा शालिनीताई पाटील यांच्या सहीत महिला भगीनी तसेच महिला पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. प्रारंभी मंदीर ते देवीची हेमांडपंथी बारवेपर्यंत हळदीची भव्य मिरवणूक काढण्यात आली होती. मळगंगा देवीच्या जयजयकाराने आसमंत दणाणून गेला होता. वाजत गाजत काढलेल्या या मिरवणुकीत महिला भगीनी मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या. त्यानंतर देवी मंदीरात आल्यानंतर महिला भावीकांनी देवीला हळद लावून दिले देवीप्रती भक्तीचा महिमा सादर केला. देवीच्या जयजयकाराच्या घोषनांबरोबर देवीगीतेही सादर करण्यात आली. मळगंगा देवीचे गीते म्हणण्यासाठी महिला भावीकांची स्पर्धा होत होती. यावेळी निघोज परिसरात भक्तिमय वातावरणात तयार झाले होते.

त्यातच झिमझीम पावसाने हवेत गारवा निर्माण झाला होता. गुरुवार दि. २ एप्रिल रोजी दुपारी पाच ते सात या वेळेत काठीची मिरवणूक काढण्यात येणार असून ही काठी ८५ फूट उंचीची असल्याने देवीची हेम ांडपंथी बारव ते मळगंगा मंदीरापर्यंत ही काठी नेण्यासाठी भक्त भावीकांना मोठे परिश्रम घ्यावे लागत असले तरी देवीचा साक्षात्कार व देवीचा

**देवीला हळद लावण्यासाठी जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा शालिनीताई विखे पाटील या निघोज येथे आवर्जून आल्या होत्या.**

आशीर्वादाने या काठीची सवाद्य मि रवणूक दोन तासात मंदीरापर्यंत जाते. भंडाऱ्याची मुक्त उधळण, वाजत गाजत,भावीक या मिरवणुकीचा आनंद घेतात. काठी उभी राहील्यानंतर ते देवीच्या श्रींची म्हणजे घागर मिरवणूक तसेच जगप्रसिद्ध रांजणखळगे (कुंड) यात्रा सुरू झाल्यानंतर मासांहार जेवणावळी सुरु होतात. तोपर्यंत १० दिवस पशूहत्या बंद असते. या दहा ते पंधरा दिवसांत देवीला नैवेद्य म्हणून घरोघर पुरणपोळीचा नैवेद्य दाखवला जातो. घरोघर सवाष्णी घालीत जवळपासच्या सात महिला भगीणींना महाप्रसादाचा लाभ घेण्यासाठी आवर्जून बोलावले जाते. अशाप्रकारे हा यात्रा उत्सव आजपासून सुरू झाला आहे.

विखे ताई या गेली अनेक वर्षात बऱ्याच वेळी त्या हळदीच्या उस्तवात आवर्जून सहभागी होत असतात. विखे ताई यावेळी म्हणाल्या मळगंगा देवी हे राज्यातील जागृत देवस्थान असून नवसाला पावणारी माता म्हणून देवीचा राज्यात नावलौकिक असून आपण देवीचे भक्त असून आपण हळदी कार्यक्रमास आवर्जून उपस्थित राहून देवीचा आशीर्वाद घेत असून देवीच्या आशीर्वादाने अहिल्यानगर जिल्ह्यात सुख समृद्धी शांती व समाधान असल्याची प्रतिक्रिया जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा शालिनीताई विखे पाटील यांनी व्यक्त केली आहे.

# सहकारी संस्था चालवताना काटकसर व चिकाटीने कारभार आवश्यक : अध्यक्ष राजेंद्र दादा नागवडे

## माध्यमिक सोसायटीत सेवानिवृत्त सभासद व गुणवंत विद्यार्थ्यांचा कृतज्ञता सोहळा उत्साहात

**श्रीगोंदा : (समर्थ गांवकरी)**




सहकारी संस्था किंवा पतसंस्थेचा कारभार चालवताना काटकसर आणि चिकाटी या दोन गुणांचा अवलंब करणे अत्यावश्यक असून, त्यासाठी संचालक मंडळ कार्यक्षम असणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन नागवडे कारखान्याचे अध्यक्ष राजेंद्र दादा नागवडे यांनी केले.

अहिल्यानगर माध्यमिक शिक्षक सोसायटी शाखा, श्रीगोंदा यांच्या वतीने सेवानिवृत्त सभासद व गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान सोहळा छत्रपती शिवाजी महाविद्यालयात आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राजेंद्र दादा नागवडे होते.

यावेळी व्यासपीठावर सोसायटीचे चेअरमन आप्पासाहेब शिंदे, निरीक्षक सचिनराव लगड, संचालक अशोकराव कारले, आप्पासाहेब जगताप, शिक्षक नेते रमजान हवलदार, तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

मार्गदर्शन करताना नागवडे म्हणाले की, माध्यमिक सोसायटीला दरमहा शंभर टक्के वसुली मिळते, ही अभिमानास्पद बाब आहे. सोसायटीने मयत सभासदांचे कर्ज माफ करणे, कन्यादान व पुत्रदान योजना राबवणे तसेच ठेवींवर चांगले व्याजदर देणे अशा कल्याणकारी योजना प्रभावीपणे राबवल्या आहेत. संस्था व सभासद यांचे हित जपणारे धोरण अवलंबले, तर सर्वांचेच कल्याण साध्य होते, असेही त्यांनी नमूद केले.

चेअरमन आप्पासाहेब शिंदे यांनी सोसायटीची आर्थिक स्थिती भक्कम असल्याचे सांगितले. संस्था बँकेकडून १२ टक्के दराने कर्ज घेते, मात्र सभासदांना ७ टक्के दराने कर्ज उपलब्ध करून देते. ठेवी वाढवून भांडवल मजबूत करण्याचा प्रयत्न सुरू असून, भविष्यात व्याजदर आणखी कमी करण्याचा मानस त्यांनी व्यक्त केला. गेल्या कार्यकाळात २५ कोटी रुपयांच्या ठेवी वाढवल्याचा उल्लेखही त्यांनी केला.

संजय गायकवाड यांनी संचालक आप्पासाहेब जगताप यांच्या कार्यपद्धतीचे कौतुक केले. शिक्षक नेते रमजान हवलदार यांनी ठेवीवरील व्याजदर वाढवण्याबरोबरच सभासदांना अधिक लाभांश देण्याची सूचना केली. तसेच, जुन्या कार्यकर्त्यांना विश्वासात घेऊन काटकसरीने कारभार करावा, असा सल्ला दिला.

यावेळी विविध मान्यवरांनी मनोगते व्यक्त करत सेवानिवृत्त सभासद व गुणवंत विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक आप्पासाहेब जगताप यांनी केले. सूत्रसंचालन हनुमंत रायकर व शिवाजीराव नागवडे यांनी केले, तर आभार प्रदर्शन आदिनाथ नागवडे यांनी मानले.

# कल्याण-मुरबाड रेल्वेमार्गाच्या भुसंपादनाची प्रक्रिया सुरु

**मुरबाड (समर्थ गांवकरी)**

## रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी केली अर्थसंकल्पात तरतुद

अनेक वर्षांपासून प्रतिक्षेत असणाऱ्या व ऐन निवडणुकीच्या तोंडावर उपस्थित होणाऱ्या कल्याण-मुरबाड रेल्वेचे स्वप्न मुरबाडकरांचे साकार होण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी अर्थसंकल्पात तरदूत केली असून या कामासाठी दोन्ही तालुक्यातील अठरा गावांमधील आवश्यक जमीन संपादित केली जाणार आहे.यामुळे कल्याण मुरबाड तालुक्यात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. कल्याणहून आंबिवलीमार्गे जाणारी कल्याण मुरबाड रेल्वे मार्गिकेच्या कामाला अखेर गती मिळाली असून या काम ासाठी आवश्यक जागेचे १८ गावातून जमिन संपादीत केली जाणार आहे. कल्याण आणि मुरबाड तालुक्यातील १५१ हेक्टर जमिनीच्या भूसंपादनाची अधिसूचना नुकतीच प्रकाशीत करण्यात आली आहे. जमिन मालकांना ३० दिवसात यावर सूचना आणि हरकती नोंदवायच्या आहेत. या नव्या मार्गिकेच्या उभारणीसाठी गेल्या अनेक दशकांपासून मागणी केली जाते आहे. कल्याण ते अहिल्यानगर असा रेल्वे मार्ग व्हावा ही अनेक वर्षांपासूनची मागणी आहे. त्यात कल्याण ते मुरबाड असा रेल्वे मार्ग उभारून त्याद्वारे कल्याण, मुरबाड तालुक्यातील विकासापासून दूर राहिलेल्या गावांना विकासाच्या प्रवाहात आणण्याची म ागणी गेल्या अनेक वर्षांपासून होती. २०१६ वर्षात तत्कालीन रेल्वे मंत्री सुरेश प्रभू यांनी या कल्याण - मुरबाड रेल्वे मार्गाची घोषणा केली होती.त्यासाठी केंद्र आणि राज्य सरकार समान भागिदारीतून हा मार्ग उभारेल असेही ठरले होते.तत्कालीन महाराष्ट्राचे अर्थमंत्री स्व.अजीतदादा पवार यांनीही याकामी महाराष्ट्र शासनाकडून पन्नास टक्के निधीची घोषणा केली होती. सुरूवातीला उल्हासनगरात हा मार्ग जाईल अशी चर्चा होती. मात्र पुढे कल्याणहून आंबिवली, टिटवाळामार्गे हा मार्ग उभारला जाईल यावर शिक्कामोर्तब झाले. हा मार्ग एकूण २८ किलोमीटरचा असणार आहे. या मार्गाच्या उभारणीसाठी सुमारे २१४ हेक्टर जागेची आवश्यकता भासणार आहे. तर ८३६ कोटींचा खर्च यासाठी अपेक्षित आहे. या भूसंपादनासाठी मोठा खर्च लागणार आहे. मार्च महिन्यातील अर्थसंकल्पीय अधिवेशनात रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी या मार्गासाठी निधीची घोषणा केली होती.त्यानंतर आता या मार्गाच्या प्रत्यक्ष भूसंपादनाला सुरूवात झाली आहे. कल्याणच्या उपविभागीय अधिकाऱ्यांनी यासाठी भूसंपादन अधिसूचना जाहीर केली आहे. कल्याण तालुक्यातील १० तर मुरबाड तालुक्यातील ८ गावांतील सुमारे १५१.४४ हेक्टर जागा यासाठी आवश्यक आहे. त्यामुळे या जमिन मालकांना जागेबाबत सूचना आणि हरकती नोंदवण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

कल्याण तालुक्यातील मोहने, अटाळी, आंबिवली, बल्याणी, मोहिली, रेवती, नवगाव, कोळींब, केळणी, मामनोली या गावातील ७१.८६ हेक्टर जागा संपादित केली जाणार आहे. तर मुरबाड तालुक्यातील पोटगाव, घोरले, नांदणी, पशेनी, देवपे, शास्त्रीनगर, माळीनगर, मुरबाड शहर या आठ भागातील ७९.५७ हेक्टर जागेचे संपादन केले जाणार आहे.

सार्वजनिक वाहतूक आणि दळणवळणाची प्रभावी साधने नसल्याची ओरड मुरबाड आणि कल्याण तालुक्यातील प्रवाशांकडून सातत्याने घेतली जाते. मुरबाड तालुक्यातील प्रवासी, नोकरदार रेल्वे प्रवासासाठी बदलापूर, शहाड, कल्याण, टिटवाळा या स्थानकांवर अवलंबून असतात. या रेल्वेमुळे येथील प्रवाशांना त्याचा मोठा फायदा होणार आहे.

# शासनाच्या मोडी लिपीतज्ञ समितीवर डॉ. राजेश बाराते यांची नियुक्ती; श्रीगोंद्यासाठी अभिमानास्पद क्षण

**श्रीगोंदा : (समर्थ गांवकरी)**



श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयातील इतिहास विभागाचे प्राध्यापक डॉ. राजेश बाराते यांची महाराष्ट्र शासनाच्या शासकीय मोडी लिपीतज्ञ म्हणून नियुक्ती झाली आहे. मराठी भाषा विभागाने दि. २७ मे २०२६ रोजी राज्यपालांच्या आदेशानुसार जारी केलेल्या शासन परिपत्रकानुसार त्यांची शासनाच्या मोडी लिपीतज्ञ समितीवर नियुक्ती करण्यात आली आहे. या नियुक्तीमुळे श्रीगोंदा तालुक्याच्या शैक्षणिक क्षेत्रात अभिमानाची भर पडली आहे.

महाविद्यालयात विद्यार्थ्यांना कौशल्याधारित शिक्षणाचा भाग म्हणून मोडी लिपीचे प्रशिक्षण दिले जाते. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना डॉ. बाराते यांनी स्वतः ही मोडी लिपीमध्ये विशेष प्रावीण्य संपादन केले. त्यांच्या ज्ञान व अनुभवाची दखल घेत शासनाने त्यांची मोडी लिपीतज्ञ म्हणून निवड केली आहे.

महाराष्ट्र शासनाच्या विविध विभागांतील प्रशासकीय, कायदेविषयक, महसूल, शैक्षणिक, अभियांत्रिकी आदी क्षेत्रांतील मोडी लिपीतील अभिलेख व कागदपत्रांचे मराठी लिप्यंतर करण्यासाठी राज्यभरातील ३० मोडी अभ्यासकांची नामिका तयार करण्यात आली असून, त्यामध्ये डॉ. राजेश बाराते यांचा समावेश करण्यात आला आहे.

डॉ. बाराते गेली १३ वर्षे श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय, श्रीगोंदा येथे इतिहास विषयाचे अध्यापन करत आहेत.

या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष राजेंद्र दादा नागवडे यांनी ही नियुक्ती संस्थेसह संपूर्ण श्रीगोंद्यासाठी अभिमानाची बाब असल्याचे सांगितले. तसेच मार्गदर्शक अनुराधाताई नागवडे, प्राचार्य डॉ. सतीशचंद्र सूर्यवंशी, विश्वस्त प्रा. सुरेश रसाळ, निरीक्षक सचिन लगड तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक व सहकाऱ्यांनी डॉ. बाराते यांचे अभिनंदन केले.

**जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे ग्रामीण तथा सक्षम प्राधिकारी यांचे समक्ष**

महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत त्यास बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत अधिनियम १९६३ याच्या कलम ११ अन्वये नोटीस.

दूरध्वनी : ०२०-२६१२५७७९ ईमेल : ddrpunegramingmail.com

**मानीव अभिहस्तांतरण अर्ज क्रमांक. ०८/२०२६-२७**
**पुणे, दिनांक: २९/०६/२०२६ / १२८३**

विभावरी अपार्टमेंट सहकारी गृहरचना संस्था मर्या.,
स.नं. ३९५, नर्मदा पार्क, मेदनकरवाडी (चाकण), ता.खेड, जि. पुणे. ४१०५०१.
तर्फे. प्राधिकृत आधिकारी श्री. संदिप सोपान गोपाळे (सचिव).....**अर्जदार**

**विरुद्ध**........मे. बालाजी डेव्हलपर्स तर्फे प्रोप्रा. १) श्री. निलेश बापुराव बोराटे (विकासक) रा.६१७/१०, गणेशनगर, नवी सांगवी, पुणे, ४११०२७.
२) श्रीमती. रुक्मीनी विठ्ठल भुजबळ (जमिन मालक),
रा. मेदनकरवाडी, चाकण, ता.खेड, जि.पुणे.४१०५०१.....**जाबदेणार**

वरील अर्जदारांनी महाराष्ट्र फ्लॅट ओनलरशिप ॲक्ट (मोफा) १९६३ चे कलम ११ अंतर्गत संस्थेच्या मिळकतीचे मानीव अभिहस्तांतरण होणेसाठी प्रस्ताव या कार्यालयाकडे सादर केलेला आहे. **सबब वरील जाब देणार यांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,** सदर संस्थेच्या अभिहस्तांतरणाबाबत त्यांचे काही म्हणणे/हरकत असल्यास त्यांनी या कार्यालयात **दिनांक २०/०७/२०२६ रोजी दुपारी ४.०० वा** जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे ग्रामीण, पहिला मजला, महाराष्ट्र राज्य सहकारी संघ इमारत, ५, बी. जे. रोड, पुणे ४११००१ येथे उपस्थित राहावे. सदर दिवशी व वेळी आपण उपस्थित न राहिल्यास अथवा दिलेल्या मुदतीत आपले काहीही लेखी म्हणणे सादर न केल्यास आपणास काहीही म्हणावयाचे नाही असे गृहीत धरून पुढील निर्णय घेण्यात येईल. याची नोंद घ्यावी.

सदरची नोटीस आज दिनांक २९/०६/२०२६ रोजी माझी सही व कार्यालयीन मुद्रेसह दिली असे.

**(प्रकाश ल. जगताप)**
**सक्षम अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक,**
**सहकारी संस्था, पुणे. (ग्रामीण)**

**जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे ग्रामीण तथा सक्षम प्राधिकारी यांचे समक्ष**

महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत त्यास बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत अधिनियम १९६३ याच्या कलम ११ अन्वये नोटीस.

दूरध्वनी : ०२०-२६१२५७७९ ईमेल : ddrpunegramingmail.com

**मानीव अभिहस्तांतरण अर्ज क्रमांक. ०७/२०२६-२७**
**पुणे, दिनांक: २९/०६/२०२६ / १२८२**

संस्कृती फेज-४ सहकारी गृहरचना संस्था मर्या.
स.नं. १०/०१/०१ कॉलेज रोड, वारुळवाडी, नारायणगाव, ता.जुन्नर जि. पुणे-४१०५०४ तर्फे. प्राधिकृत आधिकारी श्री. रविंद्र अशोक कुटे (अध्यक्ष)
व श्री. स्वप्निल दिलीप माळवे (सचिव).....**अर्जदार**

**विरुद्ध**........मे. वरदविनायक डेव्हलपर्स तर्फे प्रोप्रा.
१) श्रीमती निता लक्ष्मीकांत लोंढे (विकसक/जागा मालक)
रा. वारूळवाडी, नारायणगाव, ता.जुन्नर, पुणे. ४१०५०४. .....**जाबदेणार**

वरील अर्जदारांनी महाराष्ट्र फ्लॅट ओनरशिप ॲक्ट (मोफा) १९६३ चे कलम ११ अंतर्गत संस्थेच्या मिळकतीचे मानीव अभिहस्तांतरण होणेसाठी प्रस्ताव या कार्यालयाकडे सादर केलेला आहे. **सबब वरील जाब देणार यांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,** सदर संस्थेच्या अभिहस्तांतरणाबाबत त्यांचे काही म्हणणे/हरकत असल्यास त्यांनी या कार्यालयात **दिनांक २०/०७/२०२६ रोजी दुपारी ४.०० वा** जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे ग्रामीण, पहिला मजला, महाराष्ट्र राज्य सहकारी संघ इमारत, ५, बी. जे. रोड, पुणे ४११००१ येथे उपस्थित राहावे. सदर दिवशी व वेळी आपण उपस्थित न राहिल्यास अथवा दिलेल्या मुदतीत आपले काहीही लेखी म्हणणे सादर न केल्यास आपणास काहीही म्हणावयाचे नाही असे गृहीत धरून पुढील निर्णय घेण्यात येईल. याची नोंद घ्यावी.

सदरची नोटीस आज दिनांक २९/०६/२०२६ रोजी माझी सही व कार्यालयीन मुद्रेसह दिली असे.

**(प्रकाश ल. जगताप)**
**सक्षम अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक,**
**सहकारी संस्था, पुणे. (ग्रामीण)**

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर - ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर - ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे - ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : अ-१, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

# ज्ञानोबा-तुकाराम च्या जयघोष चैतन्य महाराजांच्या पालखीचे पंढरपूरकडे प्रस्थान








ओतूर (समर्थ गांवकरी)

जुन्नर तालुक्यातील ओतूर येथील श्री बाबाजी चैतन्य महाराजांच्या पायी पालखीचे शनिवारी दि. ४ जुलै रोजी सकाळी ११ वाजता पंढरपूरकडे प्रस्थान झाले. यावेळी पावसाच्या धारा झेलत भाविक भक्त 'ज्ञानोबा-तुकाराम, राम कृष्ण हरी' च्या जयघोषात व टाळ मृदंगाच्या गजरात तल्लीन होऊन गेले होते.

याबाबत चैतन्य महाराज प्रासादिक भजन मंडळाचे अध्यक्ष सचिन दाते, सचिव अनिल तांबे म्हणाले की, संतश्रेष्ठ तुकाराम महाराजांचे गुरू श्री बाबाजी चैतन्य महारांजाची ओतूर येथे संजीवन समाधी आहे. यामुळे ओतूर येथून जाणाऱ्या या पालखीला पंढरपूर पायी वारी सोहळ्यात मानाचे स्थान आहे. ओतूर ग्रामस्थांचा सहकार्याने सुरू केलेल्या या पालखी सोहळ्याचे हे ६६ वे वर्ष आहे.

शुक्रवारी दि. ३ जुलै रोजी या पालखी सोहळ्यास सद्गुरू बाबाजी चैतन्य महाराजांच्या संजीवन समाधी मंदिरा पासुन सुरूवात झाली, टाळ मृदुंगाच्या गजरात व राम कृष्ण हरि या मंत्र घोषात पायी पालखी सोहळा निघाल्या नंतर ओतूर पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक ज्ञानेश्वर बाजगिरे यांनी पोलिस ठाण्या समोर पालखी सोहळ्याचे स्वागत केले. यावेळी पोलिस ठाण्याच्या वतीने वारकरी व भाविकांना केळी व साबुदाणा खिचडीचे वाटप करण्यात आले.

त्यानंतर ओतूर शहराला नगर प्रदक्षिणा घालून नंतर पालखीचा पहिला मुक्काम ओतूर शहरातील मुख्य चौक पांढरी मारूती मंदिरात झाला. त्यानंतर शनिवारी सकाळी शंकर डुंबरे यांच्या वतीने नितीन हांडे यांनी सपत्नीक अभिषेक व पुजा केली. तर रथाला ओढण्याच्या बैलजोडीचा मान भगवान रामचंद्र तांबे यांना मिळाला आहे.

श्री बाबाजी चैतन्य महाराज प्रासादिक भजन मंडळाचे संस्थापक महादेव तांबे, अध्यक्ष सागर दाते, सचिव अनिल तांबे, उपाध्यक्ष जितेंद्र डुंबरे, अमोल डुंबरे, विलास घुले, सिताराम डुंबरे, रघुनाथ तांबे, शांताराम महाराज वाकर, विलास घुले, शांताराम पानसरे, जे. आर. डुंबरे, गंगाराम महाराज डुंबरे, महेंद्र पानसरे, राजेंद्र डुंबरे, रोहिदास घुले, अनिल डुंबरे, धनंजय डुंबरे, ज्ञानेश्वर पानसरे, सुनील डुंबरे, आशा डुंबरे, ठकुबाई नलावडे आदी भाविक भक्त या पालखी सोहळ्यात सहभागी झाले आहेत. सदर पायी पालखी ओतूर, आळे, बेल्हा, पाडळी, अळकुटी, लोणी मावळा, रांधे दरोडी फाटा, वडझिरे, पारनेर, पाणोली घाट, पिंपळनेर, राळेगण सिद्धी, ढवळगाव, उक्कडगाव, बेलवंडी, श्रीगोंदा, घोडेगाव, चांदगाव, टाकळी, जलालपूर, सिद्धटेक, बेर्डी, सिध्दटेक, बारडगाव, येसवडी, राशीन, कोर्टी, विहाळ, वीट, झरे, वांगी कविटगाव, कंदर, टेंभुर्णी, अरण, मोडलिंब, आष्टी, बाबळगाव मार्गे पालखी १९ दिवसांनी बुधवार दि. २२ जुलै रोजी पालखी पंढरपूर येथे दाखल होणार आहे. पंढरपुर येथे पाच दिवसांच्या विश्रांती नंतर दि. २८ जुलै रोजी परतीचा प्रवास सुरु होणार आहे. बुधवारी दि. १२ ऑगस्ट रोजी पालखीचे ओतूर येथील पांढरी मारूती मंदिर येथे पुनरागमन होणार आहे. या पालखी सोहळ्या सर्व नियोजन श्री बाबाजी चैतन्य महाराज प्रासादिक भजन मंडळ व समस्त ग्रामस्थ ओतूर हे करीत आहे.

# शिष्यवृत्ती परीक्षेत जिल्हा परिषद शाळांची उल्लेखनीय कामगिरी; ५ वी व ८ वी मिळून ३९५ विद्यार्थी पात्र

## इयत्ता ५ वीमध्ये ३८४ तर इयत्ता ८ वीमध्ये ११ विद्यार्थी शिष्यवृत्तीसाठी पात्र

ठाणे (समर्थ गांवकरी)

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्या वतीने घेण्यात आलेल्या पूर्व उच्च प्राथमिक (इयत्ता ५ वी) व पूर्व माध्यमिक (इयत्ता ८ वी) शिष्यवृत्ती परीक्षा २०२६ मध्ये जिल्हा परिषद ठाणेच्या शाळांनी उल्लेखनीय यश संपादन केले आहे. जिल्ह्यातील एकूण ३९५ विद्यार्थी शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरले असून, त्यामध्ये इयत्ता ५ वीचे ३८४ आणि ८ वीचे ११ विद्यार्थी समाविष्ट आहेत.

इयत्ता ५ वीच्या पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेसाठी जिल्ह्यातील ६६० शाळांमधील ५,०१९ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी ४,६७० विद्यार्थी परीक्षेला उपस्थित राहिले. एकूण ३८४ विद्यार्थी पात्र ठरले असून १५२ विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती प्राप्त केली आहे.

तालुकानिहाय निकालामध्ये शहापूर तालुक्याने सर्वाधिक २५६ विद्यार्थी पात्र जिल्ह्यात अव्वल स्थान पटकावले आहे. मुरबाड तालुक्यात ६७, भिवंडीमध्ये ३४, कल्याणमध्ये १६ आणि अंबरनाथमध्ये ११ विद्यार्थी पात्र ठरले आहेत.

तसेच, इयत्ता ८ वीच्या पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेसाठी जिल्ह्यातील ८० शाळांमधील ६८६ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी ६१५ विद्यार्थी परीक्षेला उपस्थित राहिले. एकूण ११ विद्यार्थी पात्र ठरले असून १० विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती मिळविली आहे.

इयत्ता ८ वीमध्ये शहापूर तालुक्यातील ८ विद्यार्थी पात्र ठरले असून ७ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती प्राप्त झाली आहे. मुरबाड तालुक्यात २ आणि अंबरनाथ तालुक्यात १ विद्यार्थी पात्र ठरला आहे.

या यशामागे विद्यार्थ्यांचे परिश्रम, शिक्षकांचे मार्गदर्शन, मुख्याध्यापकांचे नियोजन आणि पालकांचे सहकार्य महत्त्वाचे ठरले आहे. जिल्हा परिषद शाळांमध्ये गुणवत्तापूर्ण शिक्षणाबरोबरच स्पर्धा परीक्षा व शिष्यवृत्ती परीक्षांसाठी विशेष प्रशिक्षण, मार्गदर्शन वर्ग आणि सराव चाचण्यांचे सातत्याने आयोजन करण्यात येत असल्याचे शिक्षणाधिकारी (प्राथमिक) बाळासाहेब राक्षे यांनी सांगितले.

जिल्हा परिषद शाळांतील ३९५ विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती परीक्षेत यश मिळवून जिल्ह्याचा गौरव वाढविला आहे. विशेषतः शहापूर तालुक्याने केलेली उल्लेखनीय कामगिरी प्रेरणादायी आहे. गुणवत्तापूर्ण शिक्षण, स्पर्धात्मक तयारी आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी जिल्हा परिषद कटिबद्ध असून भविष्यात अधिकाधिक विद्यार्थ्यांनी अशा परीक्षांमध्ये यश संपादन करावे, यासाठी शहापूर पॅटर्न राबविण्यात येणार आहे तसेच आवश्यक सर्व सहकार्य आणि सुविधा उपलब्ध करून दिल्या जातील. – ठाणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव

जिल्हा परिषद प्रशासनाने सर्व यशस्वी विद्यार्थी, शिक्षक, मुख्याध्यापक आणि पालकांचे अभिनंदन करून आगामी काळात आणखी उत्तम कामगिरी करण्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# मराठी चित्रपट महामंडळात मेघराज राजे भोसले ह्यांचे माया ममता,टीम मार्फत स्वागत







मुंबई (समर्थ गांवकरी)

अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळाच्या पंचवार्षिक निवडणुकीमध्ये परत एकदा सर्वांचे लाडके, गोड स्वभावाचे मेघराज राजे भोसले अध्यक्ष पदी स्थानापन्न झाले.

कलाकारांच्या समस्या, कलाकारांच्या अडचणी आणि कलाकारांचे पुढील भवितव्य या सगळ्या बाबींचा विचार करूनच, नवनिर्वाचित अध्यक्ष मेघराज राजे भोसले साहेबांनी, कार्यक्रमाला आलेल्या स्पॉट बॉय पासून ते डायरेक्टर,प्रोडूसर पर्यंत सर्वांचे हसत मुखाने समस्या सोडवण्या साठी कटीबद्ध असल्याचे स्वागता तून जाहीर केले. यावेळेस वेगवेगळ्या स्तरातून आलेल्या वेगवेगळ्या कलावंतांनी आपापल्या परीने साहेबांचे सुद्धा दिलखुलास स्वागत केले. अंधेरी मुंबई स्थित ऑफिसचे सर्वेसर्वा अर्थातच विशाल पवार साहेब आणि हेमंत परब यांनी या कार्यक्रमाचे नियोजन आखले होते. यावेळेस प्रामुख्याने येणाऱ्या हृदयस्पर्शी चित्रपट माया ममता, चे निर्माते, निर्देशक वाघ साहेब यांनी मेघराज राजे भोसले आणि उपस्थितांचे अभिनंदन करताना आपल्या रुबाबदार शैलीमध्ये अक्षरशः सर्वांचे मन जिंकून घेतले. माया ममता टीम चे सह निर्माता प्रदीपजी जाधव,गायक अजय अटकाळे, प्रोडक्शन प्रमुख दिनकर अवचार, अभिनेता सुनील काटे,सुदर्शन खराटे,मोहन बोदडे, मुक्ताईनगर बोदवड चे दिग्दर्शक रामेश्वर लोहार आणि उपस्थित असलेले मुंबई परिसरातील वेगवेगळ्या दर्जाचे कलावंत उपस्थित होते. प्रत्येकाचे उत्तर देताना साहेब मात्र स्मित हास्य देऊन ते शब्द रूपाने पूर्ण करत होते. काटेकोर नियम आणि मराठी चित्रपटांच्या विकासाची हमी या तत्त्वानुसार पुढील महामंडळा चा कार्यक्रम हा सर्वच ,कलाकारांचा उत्कर्ष वर्धक होईल अशाच पद्धतीचा असेल,अशा आशयाचा विषय अध्यक्ष या ठिकाणी सांगितला. या कार्यक्रमा साठी अध्यक्ष साहेबां सोबतच सह कार्यवाह दीपक कदम साहेब, संचालक मध्ये सुभाष नकाशे साहेब,गणेश गारगोटे साहेब तसेच पल्लवी पाटील, यांनी सुद्धा कलाकारांना मार्गदर्शन केले. यावेळेस उपस्थितां मध्ये हितेश गायकवाड,एम.नटराज., रवी भातडे,भारत कोडग,पल्लवी पाटील,अजय अटकाळे, प्रदीप जाधव,सुनील काटे आशिष सातपुते( मिमिक्री) उद्धव झगडे, लक्ष्मण इंगळे आणि सुनील भालेराव उपस्थित होते.

# सिटी मार्केट परिसरातील रस्त्याच्या डांबरीकरणास मान्यता

शिर्डी (समर्थ गांवकरी)



....शिर्डी शहरातील प्रभाग क्रमांक ०७ मधील सिटी मार्केटसमोरील मुख्य रस्त्यावर पावसामुळे पाणी साचत असून मोठ्या प्रमाणात खड्डे पडले आहेत. त्यामुळे नागरिकांना ये-जा करताना मोठ्या गैरसोयींचा सामना करावा लागत होता.

या जनहिताच्या प्रश्नाबाबत शिर्डी नगरपरिषदेचे मुख्याधिकारी मा. श्री. सतीश दिघे साहेब तसेच मा. नगराध्यक्षा सौ. जयश्रीताई थोरात यांची प्रत्यक्ष भेट घेऊन निवेदन सादर करण्यात आले.

नगर-मनमाड रोड ते सिटी मार्केट कॉर्नर या मार्गावरील खड्डे व पावसामुळे निर्माण झालेल्या समस्येची मुख्याधिकारी मा. श्री. सतीश दिघे साहेब यांनी तात्काळ दखल घेतली. नागरिकांच्या गैरसोयीचा विचार करून सदर रस्त्याचे डांबरीकरण करण्यात येईल, असे त्यांनी मान्य केले.

या निर्णयाबद्दल मा. मुख्याधिकारी श्री. सतीश दिघे साहेब यांचे मनःपूर्वक आभार व्यक्त करण्यात आले.

# पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत सन्मित कटारियाचे उल्लेखनीय यश




पाथर्डी/राजेंद्र चव्हाण (समर्थ गांवकरी)

शहरातील नामांकित अशा श्री तिलोक जैन विद्यालयाचा विद्यार्थी चि. सन्मित सुनील कटारिया याने महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेतर्फे आयोजित पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती (इयत्ता आठवी स्कॉलरशिप) परीक्षेत २३८ गुण मिळवत जिल्हा गुणवत्ता यादीत मानाचे स्थान पटकावले असून तो शिष्यवृत्तीस पात्र ठरला आहे. विशेष म्हणजे त्याने यापूर्वी इयत्ता पाचवीच्या पूर्व प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेतही उल्लेखनीय यश संपादन करून शिष्यवृत्ती मिळविली होती. सलग दोन्ही शिष्यवृत्ती परीक्षांमध्ये यश मिळवत त्याने आपल्या शैक्षणिक गुणवत्तेची प्रभावी छाप पाडली आहे.

अभ्यासाबरोबरच विविध क्षेत्रांतही उल्लेखनीय कामगिरी करणारा तो एक अष्टपैलू विद्यार्थी म्हणून ओळखला जातो. विज्ञान प्रदर्शन, विविध स्पर्धा परीक्षा, तबलावादन , व्हॉलिबॉल, ग्रीन क्लब , एन .सी .सी . अवांतर स्पर्धा परीक्षा आदी उपक्रमात त्याने यापूर्वी जिल्हा व राज्यस्तरावर अनेक पारितोषिके मिळविली आहेत. त्याच्या या यशामागे त्याची सातत्यपूर्ण मेहनत, पालकांचे प्रोत्साहन आणि शिक्षकांचे योग्य मार्गदर्शन असल्याची भावना व्यक्त होत आहे.

त्याच्या या उल्लेखनीय यशाबद्दल श्री तिलोक जैन ज्ञान प्रसारक मंडळाचे उपाध्यक्ष चंपालाल गांधी, सचिव सतिश गुगळे , कोषाध्यक्ष सुरेश कुचेरिया, विश्वस्त डॉ.ललित गुगळे,राजेंद्र मुथ्था, धरमचंद गुगळे या सह कार्यकारी व सल्लागार मंडळाचे सर्व सदस्य तसेच गटशिक्षणाधिकारी शिवाजीराव कराड , विद्यालयाचे प्राचार्य अजय भंडारी , उपमुख्याध्यापक अशोक गर्जे , पर्यवेक्षक भारत गाडेकर , सुधाकर सातपुते या सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी त्याचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत .या सह शिक्षण क्षेत्रातून त्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# आ. दातेंच्या नेतृत्वावर विश्वास ठेवत अळकुटी परिसरातील कार्यकर्त्यांचा पक्षप्रवेश





पारनेर (समर्थ गांवकरी)

पारनेर तालुक्याच्या वायव्य भागात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या संघटनात्मक विस्ताराला आज नवे बळ मिळाले. विकासाभिमुख नेतृत्वावर विश्वास व्यक्त करत अळकुटी व परिसरातील विविध कार्यकर्त्यांनी पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते सर यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात जाहीर प्रवेश केला.

राष्ट्रवादी काँग्रेसच्या महिला तालुका उपाध्यक्षा सौ. रेश्माताई मच्छिंद्र गलांडे आणि तालुका उपाध्यक्ष सुरेश परंडवाल यांच्या पुढाकारातून आयोजित या कार्यक्रमात आसिफ मोमीन, राजू पारखे, अभय शित्रे, राजेंद्र शिरोळे, राजेंद्र बोरुडे, गणेश शित्रे, अयुब मोमीन, नवनाथ गाडगे, सलीम मोमीन, सोहेल मोमीन, आयान मोमीन, अस्लम शेख आणि इकबाल आतार यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचा झेंडा हाती घेत पक्षाच्या विचारधारेवर विश्वास व्यक्त केला. यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना आमदार काशिनाथ दाते सर म्हणाले, राष्ट्रवादी काँग्रेस हा सामान्य माणसाच्या आशा- आकांक्षांचा पक्ष आहे. जनतेचा विश्वास आणि विकासाचे राजकारण हीच आमची खरी ताकद आहे. अळकुटी परिसरातील प्रत्येक गावाच्या सर्वांगीण विकासासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. आज पक्षात प्रवेश करणाऱ्या प्रत्येक कार्यकर्त्याचा सन्मान राखत जनतेच्या विश्वासाला न्याय देण्यासाठी आपण सर्वजण एकजुटीने काम करू. कार्यक्रमास पारनेर राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष विक्रमसिंह कळमकर, नगरसेवक अशोक चेडे, पारनेर शहर उपाध्यक्ष सुनिल गाडगे, मच्छिंद्र गलांडे, सुखदा परंडवाल, गणेश गलांडे यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अळकुटी व परिसरातील या पक्षप्रवेशामुळे राष्ट्रवादी काँग्रेसची संघटनात्मक ताकद वायव्य भागात अधिक भक्कम झाल्याचे मानले जात आहे. स्थानिक पातळीवर विकासाच्या मुद्द्यांवर जनतेचा वाढता विश्वास आणि आमदार काशिनाथ दाते यांच्या सातत्यपूर्ण जनसंपर्कामुळे विविध स्तरांतील कार्यकर्ते पक्षाशी जोडले जात आहे. आगामी काळात या भागात राष्ट्रवादी काँग्रेसचा जनाधार आणखी मजबूत होईल.

> अळकुटी आणि परिसरातील कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षावर दाखवलेला विश्वास आमच्यासाठी मोठी जबाबदारी आहे. आमदार काशिनाथ दाते सर यांच्या विकासाभिमुख, सर्वसमावेशक आणि जनतेशी नाळ जोडलेल्या नेतृत्वामुळे आज अनेक युवा आणि ज्येष्ठ कार्यकर्ते स्वयंस्फूर्तीने पक्षात सहभागी होत आहेत. वायव्य भागातील प्रत्येक गावाच्या विकासासाठी आम्ही संघटनेच्या माध्यमातून अधिक ताकदीने काम करू. जनतेचा विश्वास हीच आमची खरी ताकद असून, तो कायम राखण्यासाठी आम्ही सदैव कटिबद्ध आहोत.
>
> – रेश्माताई गलांडे (राष्ट्रवादी काँग्रेस महिला तालुका उपाध्यक्षा)



# अकोले तालुक्यात ५८० हून अधिक एकल महिलांच्या मुलांना गावोगावी जाऊन शैक्षणिक साहित्याचे वाटप


समशेरपूर शै. साहित्य वाटप


इंदोरी शै.साहित्य वाटप





अकोले (समर्थ गांवकरी)

एकल महिलांच्या मुलांच्या शिक्षणाला प्रोत्साहन देण्यासाठी साऊ एकल महिला समितीने अकोले तालुक्यातील ५८० हून अधिक एकल महिलांच्या मुलांना त्यांच्या गावी जाऊन शैक्षणिक साहित्याचे वाटप केले.

आर्थिक अडचणींमुळे अनेक एकल महिलांना आपल्या मुलांच्या शिक्षणासाठी आवश्यक साहित्य खरेदी करणे कठीण जाते. त्यासाठी या मुला मुलींना वह्या, शालेय बॅग, डबा, पाण्याची बाटली, कंपास बॉक्स आदी साहित्य देण्यात आले.

हे वाटप करण्यासाठी अकोले तालुक्यातील समशेरपूर, ब्राह्मणवाडा, लहित, तांभोळ, वाशेरे, पाडाळणे, धामणगाव आवारी, वीरगाव, अकोले, सुगाव, कुंभेफळ, इंदोरी, रंभोडी, मेंहदुरी, बहिरवाडी, देवठाण, वाघापूर, बेलापूर, लिंगदेव, रेडे, धांदरफळ, शेलद, टाहाकारी, राजूर, गर्दणी, टाकळी, ढोकरी, खानापूर यांसह अनेक गावांमध्ये तसेच वाडी–वस्त्यांवर जाऊन वाटप करण्यात आले.

शैक्षणिक साहित्य देण्याच्या निमित्ताने महिलांच्या घरी जाऊन त्यांच्या अडचणी समजून घेतल्या.

समितीच्या कार्यकर्त्यांनी प्रत्येक गावात प्रत्यक्ष एकल महिला, त्यांच्या मुलांशी संवाद साधला. शिक्षणाचे महत्त्व, मोबाईलचा योग्य वापर, वाचनाची सवय, चांगले संस्कार आणि उज्ज्वल भविष्य घडविण्यासाठी आवश्यक असलेल्या मूल्यांबाबत मुलांना प्रेमाने मार्गदर्शन करण्यात आले. त्यामुळे हा उपक्रम केवळ साहित्य वाटपापुरता मर्यादित न राहता सामाजिक प्रबोधनाचाही एक प्रभावी उपक्रम ठरला.

याप्रसंगी संबंधित गावांतील सरपंच, शिक्षक–शिक्षिका, सामाजिक कार्यकर्ते, एकल महिलांविषयी संवेदनशील असलेले नागरिक, अंगणवाडी सेविका, आशा सेविका यांना आवर्जून निमंत्रित करण्यात आले.. ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांनी या उपक्रमाचे मनापासून कौतुक करत समितीच्या कार्याला शुभेच्छा दिल्या व त्यांनीही एकल महिलांच्या अडचणी समजून घेतल्या.

या उपक्रमासाठी समितीच्या कार्यकर्त्या प्रतिमा कुलकर्णी,सीमा भागवत,गीता आवारी,वैशाली राजगुरू,

नीता शिंदे, उषा चौधरी, कल्पना शिंदे, , , माधुरी वाकचौरे, सीना चव्हाण, अर्चना जाधव, लक्ष्मी बगाड, कल्पना सोनुले, षरेखा कोटकर आणि कासाबाई दराडे यांनी गावोगावी जाऊन परिश्रम घेतले. त्यांच्या सेवाभावी कार्यामुळे अनेक मुलांच्या चेहऱ्यावर हास्य फुलले आणि अनेक मातांच्या डोळ्यांत समाधानाचे अश्रू दाटून आले.

हा संपूर्ण उपक्रम महाराष्ट्रातील व अकोले तालुक्यातील संवेदनशील ,एकल महिलांच्या कार्यासाठी तळमळ असणाऱ्या दानशूर व्यक्तींनी दिलेल्या आर्थिक सहयोगातून घेण्यात आला.

**दरवर्षीप्रमाणे अकोल्यात एका ठिकाणी वाटप कार्यक्रम करायचो पण तसे न करता यावर्षी प्रत्यक्ष गावातील प्रमुख पदाधिकारी,नागरिक यांच्या उपस्थितीत या महिलांच्या अडचणींवर चर्चा करण्यासाठी गावोगावी जाऊन हा कार्यक्रम आयोजित केला..त्यातून एकल महिलांच्या घरी भेटी देऊन त्यांचे दुःख समजून घेण्यात आल्याचे साऊ एकल महिला समितीच्या प्रतिमा कुलकर्णी यांनी सांगितले..**

साऊ म्हणजे आमच्या लेकरांची माय! अशी भावना अनेक महिलांनी व्यक्त केली.

# महावितरणच्या गलथान कारभाराविरोधात खा. लंके यांचे जनआंदोलन

पारनेर (समर्थ गांवकरी)



महावितरणच्या कथित निष्काळजी व जनविरोधी कारभारामुळे नागरिक, शेतकरी, व्यापारी आणि ग्राहकांना भेडसावणाऱ्या विविध समस्यांच्या पार्श्वभूमीवर खासदार नीलेश लंके यांनी येत्या ८ जुलै रोजी अहिल्यानगर येथील महावितरण कार्यालयासमोर तीव्र जनआंदोलन करण्याची घोषणा केली आहे.

यासंदर्भात महावितरणचे अधीक्षक अभियंता यांना निवेदन देऊन लंके यांनी आंदोलनापूर्वीच सर्व प्रलंबित प्रश्नांवर ठोस निर्णय घेण्याची मागणी केली आहे. अन्यथा उद्भवणाऱ्या परिस्थितीस प्रशासन जबाबदार राहील, असा इशाराही त्यांनी दिला आहे.

मतदारसंघातील अनेक भागांत सुरू असलेले अघोषित व अनियमित लोडशेडिंग, जळालेले ट्रान्सफॉर्मर (डीपी) वेळेत न बदलणे, स्मार्ट मीटरमुळे वाढीव व चुकीची वीजबिले, अतिवृष्टी व वादळामुळे नुकसान झालेल्या वीज यंत्रणेची रखडलेली दुरुस्ती, सौरऊर्जा व नेट मीटरिंग प्रकरणांतील विलंब, तक्रार निवारण यंत्रणेचे अपयश, कृषी वीजजोडणीतील विलंब आणि देखभालीच्या अभावामुळे निर्माण होणारे वारंवार तांत्रिक बिघाड या प्रमुख प्रश्नांकडे त्यांनी निवेदनातून लक्ष वेधले आहे.

सौरऊर्जा योजनेसाठी पैसे भरूनही अनेक शेतकऱ्यांना एक ते दोन वर्षे सोलर पॅनेल बसवून मिळत नसल्याचा तसेच काही एजन्सीकडून अतिरिक्त रकमेची मागणी होत असल्याचा आरोपही त्यांनी केला आहे.

आंदोलनाद्वारे अघोषित लोडशेडिंग तातडीने बंद करणे, जळालेल्या डीपी कालबद्ध पद्धतीने बदलणे, स्मार्ट मीटर व वाढीव वीजबिलांची उच्चस्तरीय चौकशी करणे, स्मार्ट मीटर सक्तीचे न ठेवणे, अतिवृष्टीग्रस्त वीज पायाभूत सुविधांची त्वरित दुरुस्ती, सोलर व नेट मीटरिंगची प्रकरणे प्राधान्याने निकाली काढणे, तक्रार निवारण यंत्रणा सक्षम करून निष्काळजी अधिकाऱ्यांवर कारवाई करणे आणि कृषी वीजजोडणीची प्रलंबित कामे तातडीने पूर्ण करणे, या प्रमुख मागण्या करण्यात येणार आहेत.

स्थानिक पातळीवर वारंवार पाठपुरावा करूनही प्रश्न सुटत नसल्याने जनतेच्या संयमाचा अंत झाला आहे. त्यामुळे शेतकरी, ग्रामस्थ आणि नागरिकांसमवेत ८ जुलै रोजी लोकशाही मार्गाने जनआंदोलन करण्यात येणार आहे, असे खासदार नीलेश लंके यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे.

# पाऊस थांबला नाही... पण राहुल राऊतही थांबले नाहीत; रंधा बुद्रुकमध्ये शाळा व स्मशानभूमीत ५० वृक्षांचे वृक्षारोपण!







अकोले (समर्थ गांवकरी)

पर्यावरण संवर्धनासाठी जिद्द आणि इच्छाशक्ती असेल, तर कोणताही अडथळा मोठा नसतो, याची प्रचिती रंधा बुद्रुक येथे पाहायला मिळाली. मुसळधार पाऊस सुरू असतानाही वृक्षमित्र ग्रुपच्या वतीने आयोजित वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात पार पडला. पर्यावरणप्रेमी राहुल प्रभाकर राऊत यांनी स्वतः विविध प्रकारची रोपे उपलब्ध करून देत या उपक्रमाचे नेतृत्व केले. पाऊस कितीही पडला तरी आज वृक्षारोपण करायचेच, या निर्धाराने सर्व सहभागी चिखलात उतरले आणि हरित संकल्प पूर्ण केला.

कार्यक्रमाची सुरुवात जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, रंधा येथे वृक्षारोपणाने झाली. शाळेच्या परिसरात सावलीची व फळझाडांची लागवड करण्यात आली. यावेळी शाळेचे आदर्श शिक्षक विजय कातडे तसेच एच. एस. देशमुख यांनी मोलाचे सहकार्य केले. विद्यार्थ्यांनीही मोठ्या उत्साहाने वृक्षारोपणात सहभाग घेत पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला.

यानंतर गावातील स्मशानभूमी परिसरात बेल, निंब, वड, तुळस तसेच विविध फळझाडांसह एकूण ५० वृक्षांची लागवड करण्यात आली. भविष्यात स्मशानभूमी परिसर हिरवागार व्हावा, जैवविविधतेला चालना मिळावी आणि पुढील पिढ्यांना स्वच्छ पर्यावरणाचा लाभ व्हावा, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला.

या कार्यक्रमाला सरपंच सुंदरलाल हरी भोईर, उपसरपंच मच्छिंद्र काळू कोरडे, ग्रामविकास अधिकारी एस. सी. काकड, ग्रामपंचायत सदस्य, ग्रामपंचायत कर्मचारी, बचत गटाच्या महिला, पेसा समितीचे पदाधिकारी, ग्रामस्थ तसेच वृक्षमित्र परिवाराचे राजाराम पटेकर, अमित पटेकर, संजय पटेकर, सागर देशमुख, रामदास पटेकर, विठ्ठल वायाळ, संतोष पटेकर आणि राजू पटेकर उपस्थित होते.

यावेळी उपस्थितांनी एक झाड – एक संकल्प, हरित भविष्यासाठी एक पाऊल हा संदेश देत प्रत्येकाने किमान एक झाड लावून त्याचे संगोपन करण्याचा निर्धार व्यक्त केला.

पर्यावरणप्रेमी राहुल प्रभाकर राऊत म्हणाले, वृक्षारोपण ही केवळ मोहीम नसून पुढील पिढीला दिलेली अमूल्य भेट आहे. पाऊस, ऊन किंवा कोणतीही अडचण पर्यावरण संवर्धनाच्या कार्यात अडथळा ठरू शकत नाही. आज लावलेले प्रत्येक झाड उद्या शुद्ध हवा, स्वच्छ पाणी आणि समृद्ध निसर्ग देईल.

मुसळधार पावसातही निसर्गप्रेम जपत राबविण्यात आलेल्या या उपक्रमाचे ग्रामस्थांनी आणि उपस्थित मान्यवरांनी मनापासून कौतुक केले. रंधा बुद्रुकमधून दिलेला हा हरित संदेश आता संपूर्ण अकोले तालुक्यासाठी प्रेरणादायी ठरत आहे.

# अंबितनंतर पिंपळगाव खांड धरणही तुडुंब; आता पाणी मुळा धरणाकडे

अकोले (समर्थ गांवकरी)



अकोले तालुक्यात सुरू असलेल्या दमदार पावसामुळे धरणसाखळीतील जलसाठ्यांमध्ये मोठी वाढ झाली असून ६०० दशलक्ष घनफूट क्षमतेचे पिंपळगाव खांड धरण पूर्ण क्षमतेने भरून ओव्हरफ्लो झाले आहे. त्यामुळे शेतकरी आणि नागरिकांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

यापूर्वी १९३ दशलक्ष घनफूट क्षमतेचे अंबित धरण २८ जून रोजी पहाटे पूर्ण क्षमतेने भरले होते. त्यानंतर २९ जून रोजी अंबित धरणातील अतिरिक्त पाणी पिंपळगाव खांड धरणात दाखल झाले. वरच्या भागातील सातत्यपूर्ण पाऊस आणि अंबित धरणातून आलेल्या पाण्यामुळे अवघ्या काही दिवसांतच पिंपळगाव खांड धरणही तुडुंब भरले.

विशेष म्हणजे, मागील वर्षी पिंपळगाव खांड धरण १९ जून रोजी पूर्ण क्षमतेने भरले होते. यंदा अंबित धरण भरल्यानंतर काही दिवसांतच पिंपळगाव खांड धरण भरल्याने तालुक्यातील जलसाठ्यात मोठी भर पडली आहे.

आता पिंपळगाव खांड धरणातून होणारा अतिरिक्त पाण्याचा प्रवाह मुळा धरणाकडे वेगाने धावत आहे. त्यामुळे मुळा धरणाच्या जलसाठ्यातही लक्षणीय वाढ होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. यामुळे खरीप हंगामासाठी सिंचनाची उपलब्धता वाढणार असून पिण्याच्या पाण्याचाही प्रश्न मोठ्या प्रमाणात सुटण्यास मदत होणार आहे.

यंदाच्या पावसाने अकोले तालुक्यातील धरणसाखळी पुन्हा एकदा जलमय केली असून, अंबित–पिंपळगाव खांड–मुळा हा जलप्रवाह शेतकऱ्यांसाठी समृद्धीची नांदी ठरत आहे. प्रशासनाने नदीकाठच्या नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे

# कै. विमल यशवंत कानवडे यांचे वृद्धापकाळाने निधन

अकोले (समर्थ गांवकरी)



अकोले तालुक्यातील मुळा परिसरातील लिंगदेव वारकरी संप्रदायातील तथा प्रगतशील शेतकरी कै. विमल यशवंत कानवडे यांचे शनिवार, दि. २७ जून २०२६ रोजी दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनामुळे कानवडे परिवारासह परिसरात शोककळा पसरली आहे. अकोले तालुक्यातील महासंघाच्या महिला अध्यक्षा तथा ग्रामपंचायतच्या माजी सरपंच सौ वर्षा चौधरी यांच्या त्या मातोश्री होत.

त्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ दशक्रिया विधी सोमवार, दि. ६ जुलै २०२६ रोजी सकाळी ८.०० वाजता लिंगदेव येथे आयोजित करण्यात आला आहे. यानिमित्ताने उपस्थित राहून दिवंगत आत्म्यास श्रद्धांजली अर्पण करण्याचे आवाहन परिवाराच्या वतीने करण्यात आले आहे.

यावेळी ह.भ.प. मुक्ताताई महाराज मालुंजकर, संस्थापक, संत गुरुकृपा वारकरी शिक्षण संस्था, आळंदी देवाची यांच्या प्रवचन सेवेचे आयोजन करण्यात आले आहे.यावेळी राजकीय सामाजिक शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते

कै. विमल यशवंत कानवडे यांच्या पश्चात मुलगा श्री. मनोज यशवंत कानवडे, मुलगी सौ. वर्षा रामनाथ चौधरी तसेच समस्त कानवडे परिवार व नातेवाईक असा परिवार आहे. त्यांच्या निधनाने परिवाराने प्रेमळ, कर्तव्यदक्ष आणि जिव्हाळ्याच्या व्यक्तिमत्त्वाला मुकल्याची भावना व्यक्त होत आहे.

आता सहवास जरी नसला तरी, स्मृती सुगंध देत राहील; जीवनाच्या प्रत्येक वळणावर, आठवण तुमची येत राहील... या भावपूर्ण शब्दांत परिवाराने त्यांना श्रद्धांजली अर्पण केली आहे.

# माती, योग आणि आनंदाचा अनोखा संगम; पोदार प्रेपमध्ये 'इंटरनॅशनल मड डे २०२६' उत्साहात



संगमनेर (समर्थ गांवकरी)

पोदार प्रेप, संगमनेर येथे 'इंटरनॅशनल मड डे २०२६' निमित्त 'योग इन मड' या आगळ्यावेगळ्या संकल्पनेवर आधारित विविध शैक्षणिक, अनुभवाधारित व मनोरंजनात्मक उपक्रम अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना देणे, निसर्गाशी त्यांचे नाते दृढ करणे तसेच खेळातून शिक्षणाची संकल्पना अधिक प्रभावीपणे रुजविणे हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश होता.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पोदार इंटरनॅशनल स्कूलच्या प्राचार्या आदरणीय सौ. मिनाक्षी मिश्रा या उपस्थित होत्या. त्यांच्या शुभहस्ते फीत कापून कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी पोदार प्रेपच्या मुख्याध्यापिका सौ. मयुरा निजामपूरकर, पालकवर्ग, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रारंभी प्राचार्या सौ. मिनाक्षी मिश्रा यांनी आपल्या मनोगतात अनुभवाधारित शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित करत, बालकांचा सर्वांगीण विकास हा केवळ वर्गातील शिक्षणापुरता मर्यादित नसून प्रत्यक्ष अनुभव, मुक्त खेळ, निसर्गाशी संवाद आणि आनंददायी शिक्षण प्रक्रियेतून अधिक प्रभावीपणे घडतो, असे सांगितले. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, सर्जनशीलता, सहकार्याची भावना, समस्या सोडविण्याची क्षमता तसेच सकारात्मक दृष्टीकोन विकसित होण्यास मदत होते, असे त्यांनी नमूद केले.

यानंतर मुख्याध्यापिका सौ. मयुरा निजामपूरकर यांनी इंटरनॅशनल मड डेचे महत्त्व विशद करताना माती हा प्रत्येक बालकाच्या नैसर्गिक शिक्षणाचा अविभाज्य घटक असल्याचे सांगितले. मातीशी खेळताना मुलांचा संवेदनक्षम विकास, कल्पनाशक्ती, सर्जनशीलता, सूक्ष्म व स्थूल हालचालींचा विकास, सामाजिक कौशल्ये तसेच शारीरिक आणि मानसिक आरोग्य अधिक सक्षम होत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. अशा उपक्रमांमुळे मुलांना निसर्गाशी जवळीक साधण्याची, मुक्तपणे व्यक्त होण्याची आणि आनंदातून शिकण्याची संधी मिळते, असेही त्यांनी सांगितले.

यानंतर 'योग इन मड', योगमुद्रा सत्र, मड ॲक्टिव्हिटी एक्सप्लोरेशन, रस्सीखेच, मड फुटबॉल तसेच विविध मातीआधारित सर्जनशील उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. प्रत्येक उपक्रमामध्ये विद्यार्थी आणि पालकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत खेळ, शिक्षण आणि आनंदाचा अनोखा संगम अनुभवला. पालकांनीही मुलांसोबत मातीमध्ये खेळत संस्मरणीय क्षणांचा आनंद घेतला. संपूर्ण परिसर आनंद, उत्साह, हास्य आणि चैतन्याने भारावून गेला.

कार्यक्रमाच्या समारोपावेळी पालकांनी उपक्रमाबाबत अत्यंत सकारात्मक अभिप्राय व्यक्त केला. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी, अनुभवाधारित शिक्षणाला चालना देण्यासाठी तसेच पालक आणि मुलांमधील सुसंवाद अधिक दृढ करण्यासाठी पोदार प्रेपकडून राबविण्यात येणाऱ्या अशा नाविन्यपूर्ण उपक्रमांचे त्यांनी विशेष कौतुक केले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शाळेचे प्रशासकीय अधिकारी श्री. सागर नेरपगार यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षकवृंद तसेच सर्व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. आभार प्रदर्शनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

## थोडक्यात पण महत्वाचे

### शिष्यवृत्ती परीक्षेत महादजी शिंदे इंग्लिश मीडियम स्कूलची उल्लेखनीय कामगिरी



श्रीगोंदा : (समर्थ गांवकरी)

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्या वतीने सन २०२५–२६ मध्ये घेण्यात आलेल्या पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इयत्ता पाचवी) व पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इयत्ता आठवी) यांचा निकाल नुकताच जाहीर झाला. या परीक्षेत श्रीगोंदा येथील रयत शिक्षण संस्थेच्या महादजी शिंदे इंग्लिश मीडियम स्कूलच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन केले.

इयत्ता पाचवीमध्ये ऋग्वेद साकेत कारंजकर (२२२ गुण), प्रणवी ज्ञानेश्वर कुमकर (२१८ गुण), अथर्व अंकुश शिंदे (२०६ गुण) आणि श्लोक मनोज चाकणे (२०२ गुण) यांनी शिष्यवृत्ती प्राप्त केली. तसेच इयत्ता आठवीमध्ये मयुरेश विकास क्षीरसागर (२२० गुण) याने शिष्यवृत्ती मिळवून विद्यालयाच्या यशात भर घातली.

विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य बाबासाहेबजी भोस, उत्तर विभागीय अधिकारी नवनाथ बोडखे, विद्यालयाचे प्राचार्य दिलीप भुजबळ तसेच महादजी शिंदे इंग्लिश मीडियम स्कूलच्या मुख्याध्यापिका श्रीमती शेख एस. ए. यांनी विद्यार्थ्यांचे, पालकांचे व शिक्षकांचे अभिनंदन केले.

या यशामागे स्कॉलरशिप विभागप्रमुख श्री. एस. बी. कोळपे तसेच विषय शिक्षक आशा उंडे, पूनम जाधव, सारिका जमदाडे, काझी शब्बीर, स्वाती तरटे, चैताली शेंडगे आणि प्रतीक्षा डांगे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. विद्यालयाच्या या यशामुळे श्रीगोंदा परिसरातून विद्यार्थ्यांवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

### वसुंधरा अकॅडमीचे विहान व ऋत्विक इ.५ वी शिष्यवृत्ती परीक्षेत जिल्हा गुणवत्ता यादीत




विहान दत्तात्रय आहेर



ऋत्विक संजय वरसाळे

अकोले (समर्थ गांवकरी)

अभिनव शिक्षण संस्थेच्या वसुंधरा अकॅडमीच्या इयत्ता पाचवीच्या विद्यार्थ्यांनी सन २०२५ च्या शासकीय शिष्यवृत्ती परीक्षेच्या जिल्हा गुणवत्ता यादीत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. कु. विहान दत्तात्रय आहेर याने जिल्ह्यात १३ वा क्रमांक, तर कु.ऋत्विक संजय वरसाळे यांने २४ वा क्रमांक मिळवून शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला आहे. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल त्यांच्या आई–वडिलांसह अभिनव शिक्षण संस्थेचे, संस्थापक अध्यक्ष मधुकरराव नवले, कोषाध्यक्ष तथा वसुंधरा अक्डेमीच्या प्राचार्या डॉ. जयश्री देशमुख, सचिव विक्रम नवले, सहसचिव अल्फोन्सा डी. सर्व संचालक मंडळ, उप प्राचार्या राधिका नवले, वसुंधरा अकॅडमीचे सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.

### हतनूर धरणाचे सर्व ४१ दरवाजे उघडले; तापी व पूर्णा नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा!



रावेर (समर्थ गांवकरी)

धरणाच्या पाणलोट क्षेत्रात मागील २४ तासांत झालेल्या मुसळधार पावसामुळे जळगाव जिल्ह्यातील सर्वात मोठे व महत्त्वाचे हतनूर धरण भरल्याने धरणाचे सर्व ४१ दरवाजे उघडण्यात आले आहेत. त्यामुळे तापी व पूर्णा नदीकाठच्या गावांतील नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे.

धरणाच्या उगम क्षेत्रात झालेल्या पावसाची नोंद पुढीलप्रमाणे आहे : बऱ्हाणपूर – ५२.० मि.मी., देढतलाई – ५५.२ मि.मी., टेक्सा – २७.२ मि.मी., एरडी – ३२.० मि.मी., गोपालखेडा – ३.० मि.मी., चिखलदरा – ८२.२ मि.मी., लखपुरी – ९.४ मि.मी., लोहारा – २१.० मि.मी. आणि अकोला – ६.४ मि.मी. असा एकूण २२८.४ मि.मी. पाऊस झाला आहे.

या पावसामुळे धरणातील पाणीसाठ्यात मोठी वाढ झाल्याने सर्व ४१ दरवाजे उघडून पाण्याचा विसर्ग सुरू करण्यात आला आहे. नदीकाठच्या नागरिकांनी नदीपात्रात जाणे टाळावे, तसेच प्रशासनाच्या सूचनांचे पालन करून सतर्क राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

## उपेक्षित विद्यार्थिनींना अग्नीपंख फाउंडेशनकडून शालेय साहित्याचे वाटप; आत्मविश्वासाचे बळ देण्याचा उपक्रम



श्रीगोंदा : (समर्थ गांवकरी)

उपेक्षित घटकातील विद्यार्थिनी शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात याव्यात आणि त्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहन मिळावे या उद्देशाने श्रीगोंदा येथील मिशन गर्ल्स स्कूलमधील विद्यार्थिनींना अग्नीपंख फाउंडेशनच्या वतीने शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या प्रेरणेने कार्यरत असलेल्या अग्नीपंख फाउंडेशनने हा उपक्रम राबवून विद्यार्थिनींच्या पंखांना आत्मविश्वासाचे बळ दिले.

या कार्यक्रमात तहसीलदार सचिन डोंगरे, पोलिस निरीक्षक संजय ठेंगे आणि अग्नीपंख फाउंडेशनचे उपाध्यक्ष प्रा. संजय लाकुडझोडे यांच्या हस्ते विद्यार्थिनींना शालेय साहित्याचे वितरण करण्यात आले. तसेच विद्यार्थिनी प्रकृती घोडके हिचा विशेष सत्कार करण्यात आला.

यावेळी तहसीलदार सचिन डोंगरे म्हणाले, अग्नीपंख फाउंडेशन विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी उल्लेखनीय कार्य करत आहे. विद्यार्थ्यांनी राष्ट्रपुरुष, महान खेळाडू, उद्योजक आणि शिक्षक यांच्या कार्याचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून शिक्षणात प्रगती साधावी.

पोलिस निरीक्षक संजय ठेंगे यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, विद्यार्थ्यांना मदत करण्याची समाजाची भावना वाढत आहे. मात्र शिक्षकांनी स्वतःची मुले ज्या शाळेत शिकवतात, त्याच शाळेत प्रवेश देण्याचा आदर्श निर्माण केला तर पालकांचा शाळांवरील विश्वास अधिक दृढ होईल. मिशन गर्ल्स स्कूलमधील शिक्षकांनीही विद्यार्थीसंख्या वाढविण्यासाठी प्रयत्न करावेत. अग्नीपंख फाउंडेशनचे उपाध्यक्ष प्रा. संजय लाकुडझोडे यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित केले.

कार्यक्रमास जगतगुरू श्री संत तुकाराम महाराज वृक्षसंवर्धन समितीचे अध्यक्ष नवनाथ दरेकर, मुख्याध्यापिका सुरेखा भालेराव, पिटर रणसिंग , अमोल गव्हाणे, दत्ता जगताप, गणेश कविटकर, सुहास कुलकर्णी आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक तुषार शिंदे यांनी केले.

## 'समर्थ गावकरी' च्या बातमीचा दणका: गांधी चौकातील धोकादायक वीज पोल तातडीने सरळ!

### महावितरण प्रशासनाकडून तत्परतेने दखल

अकोले (समर्थ गांवकरी)

अकोले शहरातील अत्यंत गजबजलेल्या गांधी चौकातील वाकलेला वीज पोल कधीही कोसळून मोठी दुर्घटना घडू शकते, अशा मथळ्याखाली 'समर्थ गावकरी 'ने २७जून रोजी वृत्त प्रसिद्ध केले होते. या बातमीची महावितरण प्रशासनाने व नव्याने उपकार्यकारी अभियंता म्हणून रुजू झालेले श्रीकांत सोनवणे यांनी गंभीर दखल घेत अवघ्या आठ दिवसात हा धोकादायक पोल तातडीने सरळ केला आहे. महावितरणच्या या जलद कारवाईमुळे स्थानिक नागरिक आणि व्यापाऱ्यांनी सुटकेचा श्वास सोडला आहे.

गांधी चौकात गेल्या काही महिन्यापासून एक विजेचा पोल एका बाजूला मोठ्या प्रमाणात झुकला होता. हा पोल केवळ वीजवाहक तारांच्या आधारावर उभा असल्याने पावसाळ्यात वादळी वाऱ्यामुळे तो कधीही कोसळू शकत होता. या गंभीर समस्येकडे 'समर्थ गावकरी 'ने प्रशासनाचे लक्ष वेधले होते. तसेच सामाजिक कार्यकर्ते अतुल बोऱ्हाडे आणि स्थानिक कार्यकर्त्यांनी तातडीने दुरुस्ती न झाल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा दिला होता.

बातमी प्रसिद्ध होता ही महावितरणचे अधिकारी आणि कर्मचारी तातडीने यंत्रसामग्रीसह गांधी चौकात दाखल झाले.



गांधी चौकात नवीन पोल टाकण्या आला

त्यांनी युद्धपातळीवर काम करून तो वाकलेला पोल सरळ केला आणि योग्य पद्धतीने सुरक्षित केला. 'गावकरी 'च्या वृत्तामुळे संभाव्य जीवितहानी टळल्याने आणि प्रशासनाला जाग आल्याने गांधी चौकातील नागरिक, महिला व व्यापाऱ्यांनी 'गावकरी 'चे विशेष आभार मानले आहेत.

## राष्ट्रमाता माँ जिजाऊ यांच्या ३५३ व्या पुण्यतिथीनिमित्त स्मृतीज्योत रथयात्रेचे सोमवारी जामखेडमध्ये भव्य स्वागत

जामखेड (समर्थ गांवकरी)

स्वराज्याच्या जननी आणि छत्रपती शिवाजी महाराजांना संस्कार, शौर्य व राष्ट्रप्रेमाची प्रेरणा देणाऱ्या राष्ट्रमाता माँ जिजाऊ यांच्या ३५३ व्या पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या विचारांचा जागर करण्यासाठी स्मृतीज्योत रथयात्रा, जिजाऊ विचारांची ज्योत व जलपूजन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

राजे लखुजीराव जाधवराव यांच्या वंशजांच्या वतीने जिजाऊंचे जन्मस्थळ सिंदखेडराजा ते पाचाड (किल्ले रायगड) अशी स्मृतीज्योत रथयात्रा काढण्यात येणार असून, या यात्रेच्या माध्यमातून राष्ट्रमाता जिजाऊ यांच्या विचारांचा व कार्याचा संदेश जनसामान्यांपर्यंत पोहोचविण्याचा संकल्प करण्यात आला आहे. या रथयात्रेचा शुभारंभ रविवार, दि. ५ जुलै २०२६ रोजी सकाळी ८.३० वाजता सिंदखेडराजा येथील जिजाऊंच्या जन्मस्थळावरून मान्यवरांच्या हस्ते होणार आहे. त्यानंतर सिंदखेडराजा येथील पाच पवित्र विहिरींच्या जलाचे पूजन करून ते जल पाचाड (रायगड) येथील राष्ट्रमाता जिजाऊ यांच्या समाधीस्थळी नेण्यात येणार असून, तेथे जलाभिषेक करून जिजाऊंना अभिवादन करण्यात येईल. सोमवार, दि. ६ जुलै २०२६ रोजी




ही स्मृतीज्योत रथयात्रा जामखेड शहरात आगमन करणार आहे. यावेळी अखंड मराठा समाज, मराठा सेवा संघ, सर्व पत्रकार बांधव तसेच समस्त जामखेडकरांच्या वतीने खर्डा चौक येथे सकाळी ११ वाजता रथयात्रेचे भव्य व उत्साहपूर्ण स्वागत करण्यात येणार आहे. या स्वागत सोहळ्यात मोठ्या संख्येने शिवभक्त, जिजाऊप्रेमी, सामाजिक कार्यकर्ते, विविध संघटनांचे पदाधिकारी व नागरिक सहभागी होणार असून, राष्ट्रमाता माँ जिजाऊ यांच्या विचारांना सामूहिक अभिवादन करण्यात येणार आहे. तरी जामखेड शहर व तालुक्यातील सर्व जिजाऊ भक्त, शिवप्रेमी, सामाजिक कार्यकर्ते तसेच नागरिकांनी मोठ्या संख्येने खर्डा चौक येथे उपस्थित राहून स्मृतीज्योत रथयात्रेचे उत्स्फूर्त स्वागत करावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

## पावसाळ्यात सर्पदंशापासून सावध राहा; साप दिसल्यास मारू नका, तात्काळ तज्ज्ञांशी संपर्क साधा : जिल्हा परिषद प्रशासनाचे आवाहन

ठाणे (समर्थ गांवकरी)

पावसाळ्याच्या प्रारंभानंतर जिल्ह्यात सर्पदर्शन व सर्पदंशाच्या घटनांमध्ये वाढ होण्याची शक्यता लक्षात घेता नागरिकांनी विशेष सतर्कता बाळगावी, साप दिसल्यास घाबरून न जाता अथवा त्याला मारण्याचा प्रयत्न न करता तात्काळ प्रशिक्षित सर्पमित्र किंवा वन विभागाशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा परिषद ठाणे प्रशासनामार्फत करण्यात आले आहे.

पावसाळ्यात वाढलेली आर्द्रता, प्रजननाचा हंगाम आणि बिळांमध्ये साचणारे पाणी यामुळे साप मानवी वस्तीकडे व घरांच्या परिसरात येण्याचे प्रमाण वाढते. विशेषतः ग्रामीण भागात शेत, अंगणे, गोठे, लाकडांचे ढीग, कचऱ्याचे साठे आणि झुडपे असलेल्या ठिकाणी नागरिकांनी अधिक खबरदारी घेणे आवश्यक आहे.

जिल्हा परिषद प्रशासनाने नागरिकांना पुढील प्रतिबंधात्मक उपायांचे पालन करण्याचे आवाहन केले आहे :

घराच्या परिसरात झुडपे, लाकडांचे ढीग व कचरा साचू देऊ नये.

उंदीर व बेडूक यांसारख्या सापांच्या खाद्य प्राण्यांची संख्या वाढणार नाही, यासाठी परिसर स्वच्छ ठेवावा.

घराबाहेर ठेवलेले बूट, चप्पल वापरण्यापूर्वी नीट तपासून घ्यावेत.

घरातील अंधारे कोपरे, स्टोअररूम, रॅक व गोदामे नियमित स्वच्छ ठेवावीत.

रात्रीच्या वेळी बाहेर पडताना टॉर्चचा वापर करावा.

शेतात किंवा पाणथळ भागात काम करताना पायात बूट व संरक्षणात्मक साधनांचा वापर करावा.

सापाला दगड मारणे, काठीने हाणणे किंवा पकडण्याचा प्रयत्न करू नये. त्यामुळे साप स्वसंरक्षणासाठी हल्ला करू शकतो.

साप दिसल्यास किमान ८ ते १० फूट अंतर राखून सुरक्षित ठिकाणी थांबावे आणि प्रशिक्षित सर्पमित्रांना पाचारण करावे.

जमिनीवर न झोपता पलंगावर अथवा उंचीवर झोपावे

सर्पदंश झाल्यास कोणतेही घरगुती उपचार, जखम कापणे, विष शोषण्याचा प्रयत्न करणे किंवा घट्ट बांधणे टाळावे. रुग्णाला शांत ठेवून तात्काळ जवळच्या शासकीय आरोग्य केंद्रात किंवा रुग्णालयात दाखल करावे. जिल्ह्यातील शासकीय आरोग्य संस्थांमध्ये सर्पदंशावरील उपचार व आवश्यक प्रतिविष (पींळ झ्परज्ञश तशपे) उपलब्ध असल्याची माहिती जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. गंगाधर परगे यांनी दिली आहे.

पावसाळ्यात सर्पदर्शनाच्या घटना वाढतात. नागरिकांनी अफवा व भीतीला बळी न पडता वैज्ञानिक दृष्टिकोन स्वीकारावा. साप दिसल्यास त्याला इजा न करता प्रशिक्षित सर्पमित्र किंवा वन विभागाशी संपर्क साधावा. सर्पदंश झाल्यास त्वरित शासकीय आरोग्य संस्थेत उपचार घेणे हेच सर्वात प्रभावी व सुरक्षित पाऊल आहे. – जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव जिल्हा परिषद प्रशासनाने नागरिकांना सतर्क राहून स्वतःची आणि वन्यजीवांची सुरक्षितता जपण्याचे आवाहन केले आहे.

## जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांच्याकडून कोथुळ : ढोरजा शिव रस्त्याची प्रत्यक्ष पाहणी

### श्रीगोंदा तालुक्यातील शिव रस्ते अभियानाची दखल

श्रीगोंदा : (समर्थ गांवकरी)

मुख्यमंत्री यांच्या 'बळीराजा शासन निर्णय' अंतर्गत अहिल्यानगर जिल्ह्यात सुरू असलेल्या शिव रस्ते व पानंद रस्ते अंमलबजावणी मोहिमेची प्रत्यक्ष पाहणी करण्यासाठी अहिल्यानगर जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी श्रीगोंदा तालुक्यातील कोथुळ–ढोरजा शिव रस्त्याला भेट देऊन कामांचा सविस्तर आढावा घेतला. जिल्ह्यात लोकसहभाग, शेतकरी–प्रशासन समन्वय आणि प्रभावी अंमलबजावणीच्या माध्यमातून विकसित होत असलेल्या या रस्त्याची त्यांनी आदर्श नमुना म्हणून पाहणी केली.

यावेळी शिवपानंद शेत रस्ते चळवळीचे राज्य समन्वयक दादासाहेब जंगले पाटील यांनी श्रीगोंदा तालुक्यातील शिव रस्ते अभियानाची माहिती देताना सांगितले की, चळवळीच्या सातत्यपूर्ण जनजागृती, शेतकरी–प्रशासन समन्वय आणि शासनाच्या सकारात्मक भूमिकेमुळे तालुक्यात आतापर्यंत सुमारे ८० किलोमीटर लांबीचे ४५ शिव रस्ते यशस्वीपणे सीमांकित करून खुले करण्यात आले आहेत. अनेक वर्षांपासून वहिवाटीच्या अभावामुळे अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांना याचा मोठा दिलासा मिळाला असून शेतीमालाची वाहतूक, मशागत, सिंचन व्यवस्थापन तसेच आपत्कालीन परिस्थितीत आवश्यक दळणवळणासाठी कायम स्वरूपी मार्ग उपलब्ध झाला आहे.

यापुढील टप्प्यात सीमांकित झालेल्या सर्व शिव रस्त्यांचे दर्जेदार, सर्व ऋतूंमध्ये वापरता येतील असे मजबूत शेतरस्त्यांमध्ये रूपांतर करण्यासाठी आवश्यक निधी तातडीने उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली. तसेच श्रीगोंदा तालुक्यातील प्रत्येक गावातील शेतरस्ते, वहिवाट रस्ते, शिव रस्ते आणि पानंद रस्ते टप्प्याटप्प्याने खुले करून श्रीगोंद्याला आदर्श शेतरस्ते तालुका म्हणून राज्यात स्वतंत्र ओळख निर्माण करण्यासाठी विशेष मोहीम राबविण्याची विनंती करण्यात आली.

याचबरोबर नेवासा, पारनेर, पाथर्डी, कर्जत तसेच जिल्ह्यातील इतर तालुक्यांमध्येही मुख्यमंत्री यांच्या 'बळीराजा शासन निर्णय' ची प्रभावी व गतिमान अंमलबजावणी करून शेतकऱ्यांच्या प्रलंबित वहिवाट व शिव रस्त्यांचे प्रश्न तातडीने मार्गी लावावेत, यासंदर्भातही सविस्तर चर्चा करण्यात आली.यावेळी जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी शासनाच्या धोरणानुसार शेतकऱ्यांच्या हिताच्या कामांना सर्वोच्च प्राधान्य दिले जाईल, आवश्यक त्या सर्व बाबींची तातडीने दखल घेऊन नियमानुसार पुढील कार्यवाही केली जाईल, असे सांगितले. शिव रस्ते व पानंद रस्त्यांच्या कामांमध्ये गुणवत्तेला सर्वोच्च प्राधान्य देण्याबरोबरच महसूल, पंचायत राज, कृषी, सार्वजनिक बांधकाम आणि संबंधित सर्व विभागांनी परस्पर समन्वयाने काम करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.

या दौऱ्यामुळे श्रीगोंदा तालुक्यात सुरू असलेल्या शिव रस्ते अभियानाला अधिक बळ मिळाले असून शासन, प्रशासन आणि शेतकरी यांच्यातील समन्वय अधिक दृढ होऊन मुख्यमंत्री



यांच्या 'बळीराजा शासन निर्णय' ची प्रभावी अंमलबजावणी अधिक वेगाने होईल, असा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला.

प्रशासकीय अधिकाऱ्यांची मोठी उपस्थिती

या पाहणी दौऱ्याप्रसंगी प्रांताधिकारी कुमार चिंचकर, तहसीलदार सचिन डोंगरे, गटविकास अधिकारी राणीताई फराटे, पोलीस निरीक्षक संजय ठेंगे, तालुका कृषी अधिकारी क्रांती चौधरी, गट शिक्षणाधिकारी कुसुमकुमारी कानडी, नायब तहसीलदार मिलिंद जाधव तसेच पंचायत समिती, कृषी विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, आरोग्य विभाग, शिक्षण विभाग आणि विविध शासकीय विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

याशिवाय शिवपानंद शेत रस्ते चळवळीचे राज्य समन्वयक दादासाहेब जंगले पाटील, क्षेत्रीय समिती सदस्य ड. गोरख कडूस, भाऊसाहेब चव्हाण, दत्ता देवकाते,बापू पाटील जंगले, विठ्ठल जरांगे सुभाष जंगले तसेच सरपंच ग्रामस्थ, शेतकरी आणि शिवपानंद शेत रस्ते चळवळीचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. शिवपानंद शेत रस्ते चळवळीच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे, शेतकऱ्यांच्या सक्रिय सहभागामुळे आणि शासन–प्रशासनाच्या सकारात्मक सहकार्यामुळे श्रीगोंदा तालुका राज्यातील आदर्श शेतरस्ते विकासाच्या दिशेने वेगाने वाटचाल करत असून भविष्यात महाराष्ट्रासाठी दिशादर्शक मॉडेल ठरेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.